सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी-१०२४/प्र.क्र.१८७/पोल-१० दि.२३ एप्रिल २०२५

**विषय** :- ॲड.कौशिक म्हात्रे, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत. धारावी पो.ठा.पुणे शहर येथील गु.र.क्र.६८०/२०२४ या दाखल गुन्हयातून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणामधील कामकाजाकरीता.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. एसपीपी-१०२४/प्र.क्र.१८७/पोल-१०,दि.२३ एप्रिल २०२५. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०४२३१४५९४५२२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 29-04-2025 16:25:30

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस सह आयुक्त(का.व सु.) मुंबई.
कार्यासन अधिकारी का.क्र.१४

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.)महाराष्ट्र राज्य ,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, (का.व सु.)महाराष्ट्र राज्य ,मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु,) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक,(गुन्हे).

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**अॅड.कौशिक म्हात्रे, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत....**
**धारावी पो.ठा. मुंबई गु.र.क्र.६८०/२०२४ या दाखल गुन्हयातून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणामधील कामकाजाकरीता.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसपीपी-१०२४/प्र.क्र.१८७/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
**दिनांक:** २३ एप्रिल, २०२५.

**संदर्भ :** १.पोलीस सह आयुक्त का.व सु., मुंबई यांचे पत्र क्र.पो.सह आ/का.व सु./वा./१६९६/२०२४, दि.०४.११. २०२४.
२.शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्र. एसपीपी.२०२५/यु.ओ.आर.०४/डी-१४, दि.१७.०१.२०२५.
३.शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम,दि. २९.०७.२०१५.
४.शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम,दि. १६.०६.२०१७.

**शासन निर्णय :-**

धारावी पो.ठा. मुंबई येथील गु.र.क्र.६८०/२०२४ या दाखल गुन्ह्यातून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी अॅड.कौशिक म्हात्रे यांची विधि व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन क्र.२ येथील शासन अधिसूचनेन्वये **"विशेष सरकारी अभियोक्ता"** म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी काम पाहण्यासाठी अॅड.कौशिक म्हात्रे यांना खालीलप्रमाणे व्यावसायिक फी मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**मा.सत्र न्यायालय, मुंबई येथील कामकाजाकरीता :-**

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी - रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त)

**मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील कामकाजाकरीता :-**

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी - रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त)

उपरोक्त नमूद फी व्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ अॅड.कौशिक म्हात्रे यांना अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही अपरिणामकारक सुनावणीकरीता फी चे प्रदान करण्यात येणार नाही.

३. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधित प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा पर्यवेक्षीय अधिकाऱ्याकडून तसेच संबंधित मा. न्यायालयाच्या प्रबंधकाकडून तपासून प्रमाणित करून घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी घ्यावी.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या "मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) - २८-व्यावसायिक सेवा" या लेखाशीर्षाखालील त्या-त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधीन आणि मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा.

**५.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४७७/२०२१/व्यय-७, दि.१२.०७.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार आणि संदर्भ क्र. ३ व ४ मधील वित्त विभाग शासन निर्णयानुसार, मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायालयीन प्रकरणी नेमण्यात आलेल्या विशेष सरकारी अभियोक्त्यांना फी अदा करण्यासंदर्भात प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०४२३१४५९४५२२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HARESHWAR NAMDEO SAHANE

Digitally signed by HARESHWAR NAMDEO SAHANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=c666d6034b5e98c5d1bd37af6d50b3277469ad6a9c55fe42051469194c47c2d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A0C4666E299E972427F9DABEDD7FF52FB5313B50C0D9A59C64EC908916651EC1, cn=HARESHWAR NAMDEO SAHANE
Date: 2025.04.23 15:00:31 +05'30'

**( हरेश्वर सहाणे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), मुंबई.
४. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, धारावी पोलीस ठाणे, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र- १, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. विधि व न्याय विभाग (कार्यासन-१४), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
१०. ॲड.कौशिक मदन म्हात्रे, ऑफिस-.४०९६, २ रा मजला, रुस्तुमजी इ झोन मॉल, गोरेगांव-मुलुंड लिंक रोड, मलाड (प.) मुंबई-४०००६४.
११. निवड नस्ती (पोल-१०).